# डॉ.आंबेडकरांचे कौटुंबिक जीवन

**प्रा. डॉ. आर. एस.जाधव** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, न्यू कॉलेज कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कौटुंबिक जीवनाचे दोन भाग पडतात. एक रमाबाई आंबेडकर यांच्यासोबत चे वैवाहिक जीवन आणि दुसरा भाग म्हणजे सविता आंबेडकर यांच्या सोबतचे कौटुंबिक वैवाहिक जीवन या संशोधन पेपरचे शीर्षक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कौटुंबिक जीवन अशी निवडली आहे. त्यांनी 28 वर्षाचा संसार केला. या दीर्घकाळात अनेक यातना कष्ट त्यांच्या कुटुंबीयांना उपसावी लागली. त्यांची एकूण सहा मुले त्यापैकी पाच मुले निर्वतली एकच मुलगा राहिला यशवंत यांना आंबेडकरी जनता भैय्यासाहेब या नावाने ओळखतो. रमाईच्या मृत्यूनंतर जवळजवळ आठ ते दहा वर्षांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी डॉक्टर शारदा कबीर यांच्याशी विवाह केला. त्यावेळी डॉक्टर आंबेडकरांना अनेक आजाराने ग्रासले होती. अशा परिस्थितीत डॉ. सविता आंबेडकर यांनी बाबासाहेबांची सुश्रुषा केली त्यांचे आयुष्य वाढविण्याचा प्रयत्न केला. या सर्वांचा तटस्थपणे शोध घेणे आवश्यक आहे.

**संशोधक उद्दिष्टे**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक संघर्षात कुटुंबियांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
2. डॉ. आंबेडकरांच्या कौटुंबिक जीवनाचा पूर्वार्ध आणि त्यांच्या कौटुंबिक जीवनातील उत्तरार्धाचा शोध घेणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंब ही मूळचे कोकणातील अंबडवे गावचे रहिवाशी होते मालोजी सपकाळ हे भारतीय ब्रिटिश सैन्यात सैनिक म्हणून कार्यरत होते. त्यांचा मुलगा रामजी हे सुद्धा भारतीय ब्रिटिश सैन्यात सुभेदार पदावर कार्यरत होती रामजी व त्यांच्या पत्नी भिमाबाई यांचा सर्वात लहान मुलगा भीमराव म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. 14 एप्रिल मध्य प्रांतातील महु येथील ब्रिटिश छावणी मध्ये त्यांचा जन्म झाला. कारण त्यावेळी डॉक्टर आंबेडकरांचे वडील रामजी मालोजी सकपाळ हे महू येथे कार्यरत होते. रामजी च्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचे कुटुंब परत महाराष्ट्रात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मीराबाई नावाची आत्या होती व ती माहेरी राहत असते बाळ भीमाचा तिने सांभाळ केला बाबासाहेब सहा वर्षाचे होते. त्यावेळीच त्यांच्या आई-भिमाबाई यांचे निधन झाले. रामजी व भिमाबाईच्या 14 अपत्यापैकी केवळ तीन मुले व चार मुली वगळता बाकी सर्वांचे एक दोन वर्षाचे असतानाच निधन झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विवाह रमाबाई धोत्रे (वलंगकर) यांच्याशी 4 एप्रिल 1906 रोजी मुंबईतील भायखळा येथील भाजी मार्केटमध्ये अत्यंत साध्या पद्धतीने झाला. त्यांना बाबासाहेब प्रेमाने रामू असे म्हणत असत. उभयतांना पाच मुले झाली यशवंत, गंगाधर, रमेश, इंदू आणि राजरत्न अशी त्यांची नावे होत परंतु यशवंत व्यतिरिक्त इतर चार जणांचा बाल वयातच मृत्यू झाला. डॉक्टर आंबेडकरांची प्रगती आणि उच्च शिक्षणासाठी रमाबाईचे फार मोठे योगदान आणि समर्पण होते. डॉ. आंबेडकरांनी देखील थॉट्स ऑन पाकिस्तान या ग्रंथामध्ये कुटुंबाप्रती रमाबाईंनी केलेला त्याग आणि समर्पण याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. 1941 साली प्रकाशित झालेले हे पुस्तक त्यांनी आपल्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांना अर्पण केले आहे. इसवी सन 1923 साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहात होत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाई चे हाल पहावले नाहीत त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखाशी अडचणीशी गरीबीशी भांडत होती. रमाईने अनेक अनेक मरणे पाहिली होती.

इसवी सन 1913 साली रामजी सुभेदारांचा मृत्यू इसवी सन 1914 ते 1917 मध्ये बाबासाहेब अमेरिकेला असताना रमेश चा झालेला मृत्यू. तसेच मुलगी इंदू आणि बाबासाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव आणि आनंदरावांचा मुलगा गंगाधर चा मृत्यू पुढे 1921 साली बाबासाहेबांचा मुलगा गंगाधर इसवी सन 1926 मध्ये राजरत्न चा मृत्यू रमाईने पाहिला बाबासाहेबांचे शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांनी त्यांना कयांची माहिती कळविली सुद्धा नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईंनी कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही पती परदेशात शिक्षणासाठी गेले असताना एकट्या पडल्या घर चालविण्यासाठी तिने शेण गोऱ्या थापल्या. सरपणासाठी वन वन फिरल्या पोयबावडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टर ची पत्नी शेण वेचते म्हणून लोक नावे ठेवतील म्हणून पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री आठ नंतर वरळीला जात असत, मुलांसाठी उपवास करीत असत.

अशाप्रकारे अस्पृश्यतेच्या अग्नी दिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले अर्धपोटी उपाशी राहून अठरा अठरा तास अभ्यास करू लागले त्याचवेळी रमाईने आपल्या निष्ठेने त्यागाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत केली.

डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज मुंबई बंदराला आला होता. रमाईला नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती म्हणून त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कार प्रसंगी

दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या बोटीतून उतरताच बंदर दुमदुमून गेले. अनेक जण त्यांना भेटत होत बाबासाहेब हस्तांदन करत होते पण रमाई मात्र कोपऱ्यात उभी होती. डॉ. आंबेडकरांची नजर त्यांच्या वर गेली. त्यांनी विचारले रामू तू लांब का उभी राहिलीस रमाई म्हणाली तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज अतुर झाला असताना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नाही मी तर तुमची पत्नीच आहे मी केव्हाही भेटू शकते रमाईंनी 28 वर्षे बाबासाहेबांना साथ दिली. पुढे राजगृहात प्रवेश केल्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्य येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेश दारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटावे भेटायला आल्यावर त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत नंतर भेटा असे म्हणत आलेल्यांची रवानगी करताना त्यांचे गाव नाव कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहेत हे सारे एका नोंदवही टिपण्यास सांगत.

रमाईचे शरीर काबाडकष्टाने पोखरून गेले होते. रमाईचा आजार बळावला होता इसवी सन 1935 च्या जानेवारी महिन्यापासून रमाईचा आजार वाढत चालला होता. मे 1935 ला तर आजार खूपच विकोपाला गेला बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना प्राचारण केले. औषधोपचार ही लागू होत नव्हता एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापासून बाबासाहेब आजारी रमाईच्या जवळ बसून राहू लागले रमाई त्यांच्याकडे एकटक पाहतच बोलण्याचा प्रयत्न करत पण अंगात त्राण नसल्याने त्या बोलू सुद्धा शकत नव्हत्या. त्यांना बाबासाहेब स्वतः औषधे देत असत आणि कॉफी किंवा मोसंबीचा रस स्वतःच्या हाताने पाजण्याचा प्रयत्न करत बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असे. त्यांचा आजार काही केल्या बरा झाला नाही आणि बाबासाहेबांवर बाबासाहेबांवर दुःखाचा मोठा आघात झाला 27 मे 1935 रोजी सकाळी नऊ वाजता रमाईची प्राणज्योत मावळली. 28 वर्षाच्या संसारात प्रेमाने आणि धैर्याने, प्रेमाने भक्कम सोबत देणारी रमाबाई मध्येच अचानक सोबत सोडून कायमच्या निघून गेल्या आणि बाबासाहेब आपल्या कौटुंबिक जीवनात एकाकी झाले.

**उत्तरार्ध.......**

रमाबाई वारल्या तेव्हा बाबासाहेबांचा मुलगा यशवंत आणि पुतण्या मुकुंद लहान होती थोड्याच दिवसांनी आंबेडकरांची वहिनी मुकुंदाची आई पण वारली. त्यामुळे मुलांच्या देखभालीची जबाबदारी बाबासाहेबांच्या वर आली. घरात कोणीही बाई माणूस उरली नाही वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात ते अतिशय एकाकी पडले. पुन्हा दुसरे लग्न करायचे नाही असाच निर्णय त्यांनी घेतला होता जवळजवळ आठ ते दहा वर्षे ते एकाकी जीवन जगत होते. अनेक आजाराने ग्रासले होते. अनेक वेळा बाबासाहेब मुंबईत औषध उपचारासाठी येत असत डॉ. मालवणकरांच्याकडे त्यांचे औषधोपचार सुरू होते. तेथे त्यांची ओळख डॉ. शारदा कबीर यांच्याशी झाली त्या डॉ. मालवणकरांकडे ज्युनिअर डॉक्टर म्हणून काम करत होत्या. त्यांची आपुलकीने चौकशी केली कारण स्त्रियांच्या उन्नतीची बाबासाहेबांना कळकळ होती त्या काळात स्त्रीने डॉक्टर होणे दुर्लभ गोष्ट होती. डॉ. मालवणकर यांच्या बरोबर त्यांच्या प्रकृतीची चर्चा सुरू असताना आपल्या संपूर्ण स्वास्थ्याचा इतिहास बाबासाहेबांनी कथन केला तपासणी केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले आली की डॉक्टर साहेबांना अनेक दुर्धर रोगांनी पछाडलेले होते. मधुमेह रक्तदाब, न्यूरायटिस अशा आसाध्य व्याधी त्यांना अनेक वर्षापासून जडलेल्या होत्या. 1922 सालापासूनच त्यांच्या प्रकृतीत चढउतार सुरू झालेली होती डॉक्टर आंबेडकरांची तपासणी केल्यावर त्यांना रोज इन्सुलिन देण्याबरोबरच नेहमीच व्यायाम व जेवणात पथ्य पाळणे विशिष्ट पद्धतीचे जेवण घेणे अत्यावश्यक होते तेव्हा डॉक्टर मालवणकर आणि डॉक्टर शारदा कबीर डॉक्टर साहेबांना औषधांची माहिती आहाराबाबतच्या सूचना दिल्या. त्यावेळी डॉक्टर शारदा कबीर यांना कळून आले की त्यांच्या पत्नीचे निधन झाले आहे. आणि आणि कबीर यांना कळून आले आले की डॉक्टर आंबेडकरांना वैद्यकीय मदतीची अत्यंत गरज आहे वैद्यकीय सल्ला, मार्गदर्शन, पथ्य पाणी आणि उपचार त्वरित दिले गेले तर त्यांचे आयुष्य निश्चित वाढणार आहे.

डॉ. आंबेडकर आणि डॉ. शारदा कबीर यांच्या भेटी वाढत गेल्या बाबासाहेबांचा सुसंस्कृतपणा यात त्यांची विद्वाता याचा परिणाम डॉक्टर शारदा कबीर यांच्या तरुण मनावर झाला. पुढे त्यांचे लग्न होईल याची किंचितची कल्पना त्यांना नव्हती त्यांचे नाते फक्त डॉक्टर आणि रुग्ण एवढेच होते. बाबासाहेब म्हणाले की हे पहा डॉक्टर माझे सहकारी मला आग्रह करीत आहेत की सहचारिणी करा परंतु मला माझ्या आवडीची योग्य तिची अनुरूप स्त्री मिळणे फार कठीण आहे डॉक्टर साहेब पुढे म्हणाले की अशा सुयोग्य स्त्रीचा शोध घेणे मी तुमच्यापासूनच सुरू करतो डॉक्टर शारदा कबीर यांना काहीसा संकोच वाटला पुढे जानेवारीच्या 25 तारखेला बाबासाहेबांनी दिल्लीहून एक पत्र पाठवून डॉक्टर कबीर यांना लग्नाची मागणी घातली बरेच दिवस त्या गोंधळलेले अवस्थेतच होत्या पण शेवटी घरच्यांचा विचार करून आपला होकार कळवला डॉक्टर शारदा कबीर म्हणतात. होकार कळविताना माझ्याकडे एकच ध्येय होते डॉक्टर साहेबांची प्रकृती सुधारलीच पाहिजे तरच त्यांच्या हातून या देशाची घटना लिहिण्याची जबाबदारी चांगल्या रीतीने पार पडू शकेल. मी जसजशी अंतर्मुख होत गेले तसतशी मला जाणीव झाली की फार महान पण बरीच अवघड जबाबदारी आपण आपल्या शिरावर घेतलेली आहे.

डॉ. शारदा कबीर यांनी होकार कळविल्यानंतर साहेबांनी त्यांना एक सोन्याची साखळी पाठवली. त्या साखळीला मधोमध प्याडॉलवर कोरलेला नांगर होता. 5 फेब्रुवारी आणि 6 फेब्रुवारी 1948 ला बाबासाहेबांनी सलग दोन पत्रे डॉक्टर कबीर

यांना पाठवली त्यामध्ये साखळी आणि मेडल मागील त्यांची भावना व्यक्त केली होती. बाबासाहेबांनी असे नमूद केले होते की तुझ्याबद्दल माझ्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नांगराहून अधिक योग्य प्रतीक मी निवडू शकलो नसतो म्हणूनच मी ते साखळी सोबत पाठविले. डॉ. आंबेडकर आणि डॉ. शारदा कबीर त्यांचा विवाह 15 एप्रिल 1948 रोजी एक हार्डिंग अवेन्यू या सरकारी बंगल्यामध्ये नोंदणी पद्धतीने झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉक्टर शारदा कबीर यांची सहजीवन सुरू झाले. शारदा कबीर हे नाव बदलून सविता आंबेडकर हे नाव धारण करण्यात आले. तर आंबेडकरी जनता त्यांना 'माईसाहेब' या नावाने बोलावू लागली. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात माईसाहेबांचा प्रवेश झाला तेव्हा ते स्वतंत्र भारताचे कायदामंत्री होते तसेच भारताची राज्यघटना लिहण्यात अत्यंत व्यस्त होते डॉक्टर माईसाहेब त्यांच्या जीवनात आल्यावर बाबासाहेबांची दिनचर्या काटेकोरपणे आखण्याचा प्रयत्न केला त्यांचे जेवण, विश्रांती, औषध पाणी या सर्व गोष्टीचे वेळापत्रक आखले बाबासाहेबांना आधीच डायबिटीस होता त्यामुळे त्यांचे जेवण, पथ्य व औषधी पाणी अतिशय महत्त्वाची होते या सर्व गोष्टीचा ताळमेळ बसविण्याचा प्रयत्न माई साहेबांनी केला. बाबासाहेबांना डायलेसिस व रक्तदाबाचा त्रास असल्याने त्यावर योगासने उपयोगी ठरतात म्हणून माईसाहेब त्यांच्याकडून दररोज योगासने करवून घेत. माईसाहेब आणि बाबासाहेब लग्नानंतर प्रथमच औरंगाबादला गेले होते त्यांना बाबासाहेबांनी अजंठा वेरूळची लेणी दाखवली प्रत्येक लेण्याची चित्रांची मूर्ती कलेची जातक कथांची माहिती ते देत असत ते ऐकून माईसाहेब थक्क होत असत बुद्धाबद्दल त्यांचे आकर्षण अमर्याद होती बौद्ध काळात बौद्ध धर्माच्या सुवर्णकाळाची आणि या जगप्रसिद्ध लेण्याबद्दल त्यांना फार अभिमान वाटे.

राज्यघटनेचे ऐतिहासिक कार्य पूर्ण पाडल्यानंतर दुसरे महत्त्वाचे कार्य बाबासाहेबांनी पार पाडले ते म्हणजे हिंदू कोड बिल. याबाबत माईसाहेब म्हणतात. डॉक्टर साहेबांनी हिंदूवर जेवढे अनंत उपकार केले आहेत. तेवढे अस्पृश्यांवर देखील केलेले नाहीत हिंदू समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी प्रकृतीचीही पर्वा न करता हिंदू कोड बिल तयार केले. त्यामुळे स्त्रियांना समान हक्क प्राप्त झाले. बाबासाहेब माई साहेबांना नेहमी म्हणायची अस्थिर व भरकटणाऱ्या जहाजाला स्थिर करण्यासाठी नांगर असतो तसा तू माझा नांगर आहेस. तुझ्यामुळेच माझ्या अस्थिर जीवनाला स्थैर्य लाभले आहे.

बाबासाहेबांच्या प्रकृतीत सतत चढ उतार होत असत माईसाहेब त्यांच्या परीने काळजी घेत होत्या याबाबत त्या म्हणतात. डॉक्टर साहेबांची मी केवळ पत्नीच नव्हती तर त्यांची देखभाल करणारी डॉक्टर होती. पत्नी व डॉक्टरच्या दोन्ही भूमिका मला कराव्या लागत होत्या. डॉक्टर साहेबांच्या दिनचर्याला नियमितपणा आणून त्याचे वेळापत्रक काटेकोरपणे आखण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला वेळप्रसंगी वाईटपणा घेऊन कटूता पत्करून मला त्यांच्या प्रकृतीची व मानसिक स्वास्थ्याची काळजी घ्यावी लागत असे. कामाचा प्रचंड बोजा याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. मधुमेह आणि संधिवात याने बाबासाहेबांचे शरीर जर्जर झाले होते. साहेबांना विश्रांती मिळावी स्वास्थ्य लाभावे म्हणून भेटीस येणाऱ्या लोकांवर माईसाहेब निर्बंध घालत असत त्यामुळे त्यांना काहींची कटूता पत्करावी लागत असे कटूता पत्करून माई साहेबांना तारेवरची कसरत करावी लागे.

1953 नोव्हेंबर मध्ये दिल्लीहून मुंबईला येत असताना रेल्वेतच बाबासाहेबांना हृदयविकाराचा त्रास झाला होता पुढे मुंबईत आल्यानंतर माई साहेबांनी त्यांना नर्सिंग होम मध्ये दाखल केले त्यांच्यासोबत एक स्वतंत्र नर्स ची नेमणूक केली प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉक्टर तुळपूळे यांनी तपासणी करून औषधे दिली श्वसनाच्या त्रासामुळे त्यांना काही प्रमाणात ऑक्सिजन सुद्धा द्यावा, पुढे डॉक्टर नायर यांच्या बंगल्यावर विश्रांतीसाठी गेल्यावर साहेबांना बरे वाटू लागते. बाबासाहेबांची ढासळती प्रकृती यामुळे त्यांच्याबरोबर माईसाहेब स्वतः राज्यसभेत जात असत पुढे रंगून येतील जागतिक बौद्ध परिषदेला डॉक्टर बाबासाहेबांच्या बरोबर माईसाहेब हजर होत्या.

14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेबांनी आणि डॉक्टर माईसाहेबांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली ते दोघेही बौद्धमय झाले होते.

काटमांडू येथे झालेल्या जागतिक बौद्ध धर्म परिषदेत बाबासाहेब आणि माईसाहेब उपस्थित राहिले बौद्ध तीर्थक्षेत्रांची यात्रा ही उभयतांनी त्यांनी एकत्रित केली बाबासाहेबांचा राज्यसभेतील शेवटचा दिवस ठरला. 5 डिसेंबरच्या रात्री त्यांनी जैन मुनीशी चर्चा केली. बुद्ध आणि धम्म धर्म या ग्रंथाच्या प्रस्तावनेत बाबासाहेबांनी लिहिलेली आहे.

गेल्या पाच वर्षात माझ्या प्रकृतीत अनेक वेळा चढउतार आली, की काही वेळा माझे प्रकृती इतकी बिघडली होती डॉक्टर माझी वर्णन विझती ज्योत असे करीत परंतु या विझत्या ज्योतीला यशस्वीपणे पुन्हा प्रज्वलित करण्याचे कार्य माझ्या पत्नीच्या वैद्यकीय प्राविण्याने केली आहे यामुळेच मी हा ग्रंथ पूर्ण करू शकलो. 6 डिसेंबर 1956 रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची महापरिनिर्वाण झाली आणि डॉक्टर आंबेडकरांच्या कौटुंबिक जीवनाचा उत्तरार्ध संपला.

**निष्कर्ष**

रमाई या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी तर डॉ. सविता तथा माईसाहेब आंबेडकर या त्यांच्या दुसऱ्या सुविद्य पत्नी. 'रमाई' आणि 'माईसाहेब' हे बाबासाहेबांच्या आयुष्यातील दोन अविभाज्य अध्याय आहेत. पहिल्या अध्यायात सुभेदार रामजींचा भिवा 'बाबासाहेब' बनून दलितांचा मसिहा बनला. त्यात रमाईचे परिश्रम, साथ, पाठबळ कामी आले. तर दुसऱ्या अध्यायात बाबासाहेबांना देशाला 'संविधान' देता आले. तसेच दलितांच्या मुक्तीची धम्मक्रांतीची १९३५ सालात येवला येथे केलेली भीम प्रतिज्ञा पूर्ण करणे शक्य झाले. त्याचे सर्वस्वी श्रेय माईंना खुद्द बाबासाहेबांनीच दिलेले आहे. रमाई आणि माई या दोघांचेही आपल्या जीवनातील स्थान आणि योगदान स्वत: बाबासाहेबांनी लिखित रुपात कथन केलेले आहे. अन त्यांचा प्रत्येक शब्द हा जनतेसाठी प्रमाण आणि शिरसावंद्य आहे. त्यामुळे रमाई आणि माई यांना वेगळे समजण्याचा, त्यांच्यात फरक करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**संदर्भ**

1. प्रधान ग. प्र. (२००९), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या शब्दात,' सुगावा प्रकाशन, पुणे.

2. अहिरे वाल्मिका एलिंजे (२०२३), 'क्रांतिसूर्याची महानायिका रमाई', प्रकाशन संविधान सत्ता, मुंबई.

3.. डॉ. आंबेडकर सविता भीमराव (२०२०), 'डॉ. आंबेडकरांच्या सहवासात', तथागत प्रकाशन, कल्याण.

4. https.//Mr.Wikipedia.Org.Wiki

5. News18.Marathi.Com

६. संपादक शेजवळ सुधाकर, (२०२३), 'डॉ. माईसाहेब आंबेडकर सूर्यप्रभा', पुस्तक मार्केट पब्लिकेशन्स, पुणे.